Chairman
**Vidyadhar Anaskar**
M.Com., D.T.L., D.L.L. & L.W., LL.B.
Vice Chairman
**Ramakant Khetan**
B.Sc., LL.B.
Chief Executive & Secretary
**Sayali Bhoir**
B.Com., G.D.C. & A., LL.B., C.A.I.I.B
MBA (Banking & Finance)

# The Maharashtra Urban Co-op. Banks' Federation Ltd.

(Regd. No. BOM-GNL-8 of 9th March 1979)
Bharatiya Krida Mandir, 4th Floor,
Wadala, Mumbai - 400 031. P. B. No. 7120,
Tel. : 022 - 2413 5797, Fax : 022 - 2415 1185
E-mail : admin@mucbf.com • www.mucbf.com

परिपत्रक: एमयुसीबीएफ/४०/६/२०१८-१९
दिनांक: १५ जून,२०१८

**प्रति,**
**मा.अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी**
सर्व नागरी सहकारी बँका व
जिल्हा/विभागीय असोसिएशन्स्
महाराष्ट्र राज्य.

**महोदय,**

आपणांस कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची 'शिखर बँक' असलेल्या दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या प्रशासक मंडळाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ बँकींग तज्ज्ञ व दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनचे विद्यमान अध्यक्ष **मा.श्री.विद्याधर अनास्कर** यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झालेले मा.श्री.विद्याधर अनास्कर हे सहकारी बँकींग क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. सहकारी बँकींग क्षेत्रातील गेल्या ३० वर्षातील त्यांचे योगदान खूप मोलाचे आहे. त्यांनी शासकीय व निमशासकीय क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थायी सल्लागार समितीवर ते गेली १२ वर्षे कार्यरत आहेत. रिझर्व्ह बँकेने राज्यातील नागरी सहकारी बँकांसाठी स्थापन केलेल्या टॅफकबवर श्री.अनास्करजी नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सहकारी विभागाने सहकारी संस्थांसाठी वेळोवेळी गठीत केलेल्या विविध समित्यांवर त्यांनी सदस्य म्हणून काम पाहिले आहे. केंद्र सरकारने नागरी सहकारी बँकांसाठी गठीत केलेल्या सल्लागार समितीचे ते सदस्य आहेत. सन २०१३ सालामध्ये ९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने राज्याच्या सहकार कायद्यात दुरुस्त्या सूचविणाऱ्या समितीचे श्री अनास्करजी उपाध्यक्ष होते, तसेच नवी दिल्लीच्या नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् अॅन्ड क्रेडिट सोसायटीज लिमिटेडचे ते उपाध्यक्ष आहेत.

बँकींग साक्षरता प्रतिष्ठान या धर्मदाय संस्थेतर्फे गेली २५ पेक्षा जास्त वर्षे सामान्य जनतेसह राज्यातील व परराज्यातील सर्व सहकारी बँकांना श्री.अनास्करजी मोफत सल्ला देत आहेत. वर्तमानपत्रे, मासिके व नागरी बँक वार्तापत्रातूनदेखील ते सातत्याने बँकींग विषयक विपुल लेखन करत आले आहेत.

मा.श्री.विद्याधर अनास्कर यांची दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन.

कळावे.

आपली विश्वासू,

**सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव